# महादूत जनबिंदू

नाशिक


शनिवार २० जून २०२६

वर्ष १ | अंक २ | किंमत ₹3

Website : www.mhdu.in

RNI : MHMAR/26/A3622

MHDU News चे अधिकृत वृत्तपत्र    वर्ष - पहिले (२०२६ )    संपादक: विशाल सं भदाणे

## ऑपरेशन टायगरनंतर राजाभाऊ वाजेंची राज्यभर चर्चा; एकनिष्ठ राहिल्याने नाशिककरांकडून कौतुकाचा वर्षाव

महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना वेग आला असताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. ठाकरे गटातील काही खासदार पक्षांतराच्या तयारीत असल्याच्या चर्चांदरम्यान राजाभाऊ वाजे यांना देखील मोठ्या आर्थिक ऑफर्स, विकास निधी आणि कर्जमुक्तीचे आमिष दाखविण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, या सर्व प्रयत्नांना नकार देत त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी आपली निष्ठा कायम ठेवली असल्याचे बोलले जात आहे.

**सिन्नरमधील निवासस्थानी रंगली गुप्त चर्चा**

माहितीनुसार, एप्रिल महिन्यात काही राजकीय प्रतिनिधींनी सिन्नर येथील वाजे कुटुंबीयांच्या निवासस्थानी भेट दिली होती. या भेटीदरम्यान जवळपास दोन ते अडीच तास विविध राजकीय पर्यायांवर चर्चा झाली. खासदार राजाभाऊ वाजे यांनी कोणताही निर्णय घेण्यापूर्वी कुटुंबीयांशी चर्चा करण्याची भूमिका घेतल्याने संबंधित व्यक्तींनी त्यांच्या वडिलांशी सविस्तर संवाद साधल्याचे सांगितले जाते.

**३० कोटींपासून १०० कोटींच्या विकासकामांपर्यंत प्रस्ताव?**

या चर्चेदरम्यान आर्थिक मदत, विकासकामांसाठी मोठा निधी आणि भविष्यातील राजकीय संधी यांसारखे अनेक प्रस्ताव समोर ठेवण्यात आल्याची चर्चा आहे. आगामी निवडणुकांची चिंता करू नका, सर्व जबाबदारी आम्ही घेऊ, अशा आशयाचे आश्वासनही देण्यात आल्याचे बोलले जात आहे.

**कर्जमुक्तीची ऑफरही धुडकावली**

लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या आर्थिक खर्चाचा विषय चर्चेत आल्यानंतर खासदार राजाभाऊ वाजे यांना पूर्णपणे कर्जमुक्त करण्याची तयारी दर्शविण्यात आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मात्र, कोणत्याही प्रकारच्या आमिषाला बळी न पडता वाजे कुटुंबीयांनी आपली भूमिका बदलण्यास स्पष्ट नकार दिल्याचे समजते.

**'तुम्ही चुकीच्या दारात आलात'**

चर्चेदरम्यान वाजे कुटुंबीयांनी पक्षांतराचा विषय स्पष्टपणे फेटाळून लावल्याचे सांगितले जाते. "आमची भूमिका ठाम आहे, तुम्ही चुकीच्या माणसांकडे आला आहात," अशा शब्दांत हा विषय संपविण्यात आल्याची माहिती राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे.

**दिल्लीतही निष्ठेची पुनरावृत्ती**

दरम्यान, दिल्लीतील घडामोडींमध्येही राजाभाऊ वाजे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्या उपस्थितीत त्यांनी आपण पक्षासोबतच असल्याचा पुनरुच्चार केला. त्यामुळे ठाकरे गटातील संभाव्य फुटीच्या चर्चांमध्ये नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे हे अपवाद ठरल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

**'नॉट फॉर सेल'चा राजकीय संदेश**

नाशिक लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराचा पराभव करून विजयी झालेल्या राजाभाऊ वाजे यांना आपल्या गोटात आणण्यासाठी अनेक स्तरांवर प्रयत्न झाल्याची चर्चा असली, तरी त्यांनी कोणत्याही दबावाला किंवा आमिषाला बळी न पडता आपली राजकीय भूमिका कायम ठेवली. त्यामुळे सध्या नाशिकच्या राजकारणात एकच चर्चा रंगली आहे – **"राजाभाऊ वाजे... नॉट फॉर सेल!"**


### खासदार राजाभाऊ वाजे भावुक! घरी परतताच सर्व प्रथम वडिलांचे घेतले आशीर्वाद

दिल्लीतील राजकीय घडामोडींनंतर नाशिकमध्ये परतलेल्या खासदार राजाभाऊ वाजे यांनी घरी पोहोचताच सर्वप्रथम आपल्या वडिलांचे आशीर्वाद घेतले. या भावनिक क्षणाचे छायाचित्र आणि व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहेत.

राजकीय व्यस्ततेच्या काळातही कुटुंबीयांप्रती असलेला आदर आणि जिव्हाळा जपणाऱ्या या कृतीचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे. वडिलांच्या आशीर्वादाने पुढील राजकीय वाटचालीसाठी प्रेरणा आणि बळ मिळत असल्याची भावना समर्थकांनी व्यक्त केली.

सध्या नाशिकच्या राजकीय वर्तुळात राजाभाऊ वाजे यांच्या या भावनिक भेटीची चर्चा रंगली असून, अनेकांनी त्यांच्या संस्कारांचे कौतुक केले आहे.


## संजय राऊतांच्या कौतुकानंतर खासदार राजाभाऊ वाजे भावुक; पत्रकार परिषदेतील क्षण चर्चेत



राज्यात सध्या चर्चेत असलेल्या 'ऑपरेशन टायगर'च्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांच्या भूमिकेचे विशेष कौतुक केले. "राजाभाऊ वाजे हे उद्धव ठाकरे यांच्यासोबत ठामपणे उभे आहेत. यालाच आम्ही निष्ठा आणि श्रद्धा म्हणतो," असे वक्तव्य संजय राऊत यांनी केले. त्यांच्या या वक्तव्यानंतर पत्रकार परिषदेत उपस्थित असलेले खासदार राजाभाऊ वाजे भावुक झाल्याचे दिसून आले. राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांदरम्यान पक्षनिष्ठेचा उल्लेख करत करण्यात आलेल्या या कौतुकामुळे वाजे यांच्या भावना अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. पत्रकार परिषदेतील हा भावनिक क्षण उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारा ठरला.

दरम्यान, संजय राऊत यांच्या वक्तव्यानंतर राजाभाऊ वाजे यांच्या एकनिष्ठतेची चर्चा राजकीय वर्तुळासह नाशिकमध्येही रंगू लागली आहे.

## राजाभाऊ वाजे यांचे नाशिक रेल्वे स्थानकावर जंगी स्वागत; शिवसैनिकआणि नाशिककरांची तुफान गर्दी



दिल्लीहून राजधानी एक्सप्रेसने नाशिकमध्ये परतलेल्या नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांचे नाशिक रोड रेल्वे स्थानकावर शिवसैनिक आणि समर्थकांकडून उत्साहात स्वागत करण्यात आले. ऑपरेशन टायगरच्या राजकीय चर्चांदरम्यान आपली भूमिका ठाम ठेवणारे राजाभाऊ वाजे यांचे स्वागत करण्यासाठी मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि नागरिक स्थानकावर उपस्थित होते.

राजधानी एक्सप्रेस स्थानकात दाखल होताच घोषणाबाजी, ढोल-ताशांचा गजर आणि फटाक्यांच्या आतषबाजीत परिसर दणाणून गेला. स्वागतासाठी जमलेल्या समर्थकांनी फुलांचा वर्षाव करत राजाभाऊ वाजे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी रेल्वे स्थानक परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. ऑपरेशन टायगरच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला असताना राजाभाऊ वाजे यांनी आपली भूमिका कायम ठेवत पक्षनिष्ठा जपल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर नाशिककर आणि शिवसैनिकांनी त्यांच्या स्वागतासाठी मोठी गर्दी केल्याचे पाहायला मिळाले.

स्वागत सोहळ्यात शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. स्थानकापासून शहरातील विविध भागांपर्यंत समर्थकांकडून जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले.

## नाशिकमध्ये खळबळ! तपोवन परिसरात सुटकेसमध्ये महिलेचा कुजलेला मृतदेह आढळला



**नाशिक | प्रतिनिधी**

नाशिक शहरातील तपोवन परिसरात रविवारी सकाळी उघडकीस आलेल्या एका धक्कादायक घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. केवडी बन परिसरातील गोशाळेजवळ संशयास्पद अवस्थेत पडलेल्या सुटकेसमध्ये एका महिलेचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास परिसरात काम करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांना तीव्र दुर्गंधी जाणवू लागली. संशय आल्याने त्यांनी परिसराची पाहणी केली असता गोशाळेजवळ एक सुटकेस आणि गोणी आढळून आली. संबंधित वस्तूंची तपासणी केली असता त्यामध्ये महिलेचा मृतदेह असल्याचे समोर आले. घटनेची माहिती तत्काळ पोलिसांना देण्यात आली.

माहिती मिळताच पंचवटी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. प्राथमिक तपासात मृतदेह महिलेचा असल्याचे स्पष्ट झाले असून तो काही दिवसांपूर्वीचा असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मृतदेह सुटकेसमध्ये भरून निर्जनस्थळी टाकण्यात आल्याने ही हत्या असण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत तपासाची सूत्रे हाती घेतली. तसेच श्वान पथक आणि गुन्हे शोध पथकाच्या मदतीने परिसराची तपासणी करण्यात आली. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला असून मृत्यूचे नेमके कारण अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी पोलिसांकडून बेपत्ता व्यक्तींच्या नोंदींची पडताळणी सुरू करण्यात आली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू असलेल्या आणि नागरिकांची वर्दळ असलेल्या भागात अशी घटना उघडकीस आल्याने शहरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे."

## सततच्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर गंगापूर धरणाचा बॅकवॉटर पॉईंट कायमस्वरूपी बंद

**नाशिक** शहरातील गंगापूर धरणाच्या बॅकवॉटर परिसरात गेल्या काही वर्षांत वारंवार अपघात व बुडून मृत्यूच्या घटना घडत असल्याने प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत बॅकवॉटर पॉईंट कायमस्वरूपी बंद करण्याच्या सूचना जारी केल्या आहेत.

पर्यटक आणि नागरिक मोठ्या संख्येने या ठिकाणी भेट देत असतात. मात्र, सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष, खोल पाण्याचा अंदाज न येणे आणि धोकादायक भागात प्रवेश यामुळे अनेक दुर्घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी संबंधित यंत्रणेकडून हा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रशासनाने नागरिकांना बंदी घालण्यात आलेल्या परिसरात प्रवेश न करण्याचे आवाहन केले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाईचा इशाराही दिला आहे. दरम्यान, या निर्णयामुळे भविष्यात अपघातांच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नाशिक ‘सुटकेस हत्याकांड’ उघड; लिव्ह-इन पार्टनरनेच घेतला सुनिता विश्वकर्मांचा जीव, कर्नाटकातून अटक



नाशिकच्या तपोवन परिसरात सुटकेसमध्ये आढळलेल्या महिलेच्या मृतदेह प्रकरणाचा अखेर उलगडा झाला असून, मृत महिलेची ओळख सुनिता विश्वकर्मा (वय 30) अशी पटली आहे. या प्रकरणी तिच्यासोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणारा गोपीनाथ रवींद्र गोसावी (वय 40) याला आडगाव पोलिसांनी कर्नाटकातून अटक केली आहे.


पोलिस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, उपनगर परिसरात राहणाऱ्या गोपीनाथ गोसावीचे सुनिता विश्वकर्मा हिच्यासोबत प्रेमसंबंध होते. सुनिता विवाहित असली तरी पतीपासून विभक्त झाल्यानंतर ती काही वर्षांपासून गोसावीसोबत राहत होती. 13 जून रोजी रात्री दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. वाद वाढल्यानंतर मद्यधुंद अवस्थेतील गोपीनाथने सुनिताला मारहाण करत तिचे नाक, तोंड आणि गळा दाबला. श्वास गुदमरल्याने तिचा मृत्यू झाला.

घटनेनंतर गोपीनाथने मृतदेह प्लास्टिकच्या गोणीत बांधून घरातील सुटकेसमध्ये भरला. तब्बल एक दिवस मृतदेह घरातच ठेवल्यानंतर रविवारी रात्री स्कुटीवरून तो तपोवन परिसरात नेऊन रस्त्याच्या कडेला फेकून दिला. त्यानंतर पत्नीला सोबत घेऊन कर्नाटकातील मंगरूळ येथे सासूरवाडीकडे पलायन केले.

या संपूर्ण प्रकरणाला धक्कादायक वळण तेव्हा मिळाले, जेव्हा खून केल्यानंतर गोपीनाथने आपल्या भावाला फोन करून घडलेला प्रकार सांगितला. मात्र तो दारूच्या नशेत बोलत असल्याचे समजून भावाने त्याकडे फारसे गांभीर्याने लक्ष दिले नाही. काही दिवसांनी तपोवन परिसरात सुटकेसमध्ये महिलेचा मृतदेह आढळल्याची बातमी प्रसारमाध्यमांत झळकताच भावाला संशय आला. गोपीनाथने फोनवर सांगितलेला प्रकार आणि बातमीतील तपशील जुळत असल्याचे लक्षात येताच त्याच्या पायाखालची जमीन सरकली. त्याने तातडीने पोलिसांशी संपर्क साधून महत्त्वाची माहिती दिली.

भावाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आडगाव पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. दरम्यान, सुनिता विश्वकर्मा हिच्या बहिणीने मृतदेहाची ओळख पटविल्यानंतर तपास अधिक वेगाने पुढे सरकला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पिसे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने कर्नाटकातील मंगरूळ येथे जाऊन गोपीनाथ गोसावी याला ताब्यात घेतले.


अशा प्रकारे, खून केल्यानंतर भावाला केलेला एक फोन आणि त्यानंतर भावाने पोलिसांना दिलेली माहिती यामुळे नाशिकमध्ये खळबळ उडालेल्या ‘सुटकेस हत्याकांडाचा’ उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.




# भेसळखोरांवर प्रशासनाचा वचक; मंत्री नरहरी झिरवाळांची पहाटेच नाशिक दूध बाजारात धडक

**नाशिक :** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर राज्यभर भेसळविरोधी मोहिमेला वेग आला आहे. त्याच पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शुक्रवारी सकाळी जुने नाशिक येथील दूध बाजारात अचानक भेट देत दूध विक्रेत्यांच्या दुधाची प्रत्यक्ष तपासणी केली. या कारवाईमुळे दूध विक्रेते आणि नागरिकांमध्ये एकच चर्चा रंगली.

सकाळी सुमारे सातच्या सुमारास अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह दूध बाजारात दाखल झालेल्या मंत्री झिरवाळ यांनी दूध विक्रेते आणि व्यावसायिकांशी संवाद साधत दूध संकलन, साठवणूक आणि विक्री प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वतः दुधाचे नमुने घेत विविध निकषांवर तपासणी करण्याच्या सूचना दिल्या.



अधिकाऱ्यांनी घटनास्थळीच नऊ प्रकारच्या चाचण्या करून दुधात भेसळ आहे का, याची पडताळणी केली.

तपासणीदरम्यान कोणत्याही नमुन्यात भेसळ आढळून आली नसून सर्व अहवाल निगेटिव्ह आल्याची माहिती मंत्री झिरवाळ यांनी दिली. प्राथमिक तपासणीनुसार बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असलेले दूध सध्या भेसळमुक्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. याशिवाय दूध विक्रेत्यांकडून मागील दिवस आणि सध्याच्या दिवसाच्या दूध साठ्याची माहितीही घेण्यात आली. दोन्ही दिवसांमध्ये जवळपास चार हजार लिटर दूध एकसमान प्रमाणात उपलब्ध असल्याचे समोर आले. या आकडेवारीवरूनही दूधामध्ये कोणत्याही प्रकारची संशयास्पद वाढ अथवा भेसळीचा प्रकार झालेला नसल्याचे निदर्शनास आले.

राज्यातील काही भागांमध्ये भेसळविरोधी कारवाया सुरू असताना नाशिकमध्येही अशा तपासण्या नियमितपणे व्हाव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत होती. त्यानुसार नाशिककरांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही तपासणी करण्यात आल्याचे मंत्री झिरवाळ यांनी सांगितले. तसेच अन्नभेसळ रोखण्यासाठी भविष्यातही अशाच प्रकारच्या धडक कारवाया आणि IMPACT तपासणी मोहीम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शहरातील अशोकस्तंभ परिसरातील एका मेडिकल स्टोअरचीही तपासणी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मंत्री स्वतः रस्त्यावर उतरून तपासणी करत असल्याने नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले असून भेसळखोरांविरोधात प्रशासनाने घेतलेल्या आक्रमक भूमिकेची शहरभर चर्चा सुरू आहे.

# मंत्री गिरीश महाजन यांच्या कथित फोटोप्रकरणी सायबर गुन्हा दाखल; मॉर्फ केलेले फोटो...

राज्याचे मंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते गिरीश महाजन यांच्याशी संबंधित काही कथित आक्षेपार्ह छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. या प्रकरणी जळगाव सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, संबंधित छायाचित्रे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार किंवा मॉर्फ करण्यात आल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात आला आहे.

सायबर पोलिसांच्या प्राथमिक तपासात एका सोशल मीडिया खात्यामार्फत मंत्री महाजन यांची प्रतिमा मलिन करण्याच्या उद्देशाने दिशाभूल करणारी छायाचित्रे प्रसारित करण्यात आल्याचे



समोर आले आहे. प्राप्त तक्रारीच्या आधारे भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तपास यंत्रणांनी संबंधित सोशल मीडिया खाते, पोस्टचा मूळ स्रोत आणि छायाचित्रांचा प्रसार करणाऱ्या व्यक्तींचा शोध सुरू केला आहे. डिजिटल पुरावे गोळा करण्याचे काम वेगाने सुरू असून, या संपूर्ण प्रकरणामागील नेमकी साखळी उघड करण्यासाठी सखोल तपास केला जात आहे.

दरम्यान, या कथित छायाचित्रांमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले असून सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. विरोधकांकडून टीका होत असताना समर्थकांकडून निष्पक्ष चौकशीची मागणी केली जात आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना मंत्री गिरीश महाजन यांनी पोलिसांकडे अधिकृत तक्रार दाखल केल्याची माहिती दिली. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करत चौकशीनंतर सत्य जनतेसमोर येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



# नाशिकमध्ये पाणी गळतीवर नागरिकांचा अनोखा निषेध; प्रशासनाला जाग येणार का?

नाशिक | प्रतिनिधी

नाशिक शहरातील विविध भागांमध्ये पाणीपुरवठ्याच्या पाइपलाइनमधून मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार करण्यात येत आहेत. मात्र, अनेकदा तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून वेळेत दुरुस्ती न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर एका जागरूक नागरिकाने गळती होत असलेल्या पाइपलाइनमधून वाहणाऱ्या पाण्यात थेट अंघोळ करून अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, महानगरपालिकेच्या कारभारावर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

एकीकडे महानगरपालिका नागरिकांना ‘पाणी जपून वापरा’ असे आवाहन करत दर शनिवारी पाणीपुरवठा बंद ठेवते, तर दुसरीकडे शहरभरातील गळतीच्या पाइपलाइनमधून दररोज हजारो ते लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे वास्तव समोर येत आहे.

सध्या अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची झळ नागरिकांना सहन करावी लागत असताना, पाण्याची कमतरता ही नैसर्गिक कारणांमुळे आहे की प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे, असा सवाल नाशिककर उपस्थित करत आहेत.

## नाशिक पोलिसांची मोठी कारवाई; १८ लाखांच्या एमडी ड्रग्जसह राजस्थानातील तीन युवक अटकेत

नाशिक, प्रतिनिधी : शहरात अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी नाशिक पोलिसांनी मोठी कारवाई करत १८ लाख रुपये किमतीच्या एमडी (मेफेड्रोन) ड्रग्जसह राजस्थानातील जोधपूर येथील तीन युवकांना अटक केली आहे. या कारवाईमुळे शहरातील अमली पदार्थांच्या अवैध व्यापाराला मोठा धक्का बसला आहे.

पोलिसांना गेल्या काही दिवसांपासून नाशिकमध्ये राजस्थानमधून मोठ्या प्रमाणात अफू व एमडी ड्रग्जची तस्करी होत असल्याची गुप्त माहिती मिळत होती. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी उपनगर परिसरात सापळा रचून संशयितांवर नजर ठेवली.

दरम्यान, संशयास्पद हालचाली आढळल्यानंतर पोलिसांनी तिघांना ताब्यात घेत तपास केला असता त्यांच्याकडून सुमारे १८ लाख रुपये किमतीचे एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले. अटक करण्यात आलेले तिन्ही आरोपी राजस्थानातील जोधपूर येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी आरोपींविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून त्यांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाच्या आदेशानंतर त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून नाशिकमध्ये अमली पदार्थांचे जाळे किती विस्तृत आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत.

# 23 लाखांच्या चोरीप्रकरणी 3 महिला आरोपी जेरबंद; नाशिक गुन्हे शाखा अंबड युनिट-3 ची उल्लेखनीय कामगिरी

**नाशिक | प्रतिनिधी**

गंगापूर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या 23 लाख रुपयांच्या चोरीच्या गुन्ह्याचा नाशिक शहर गुन्हे शाखेच्या अंबड युनिट-3 ने अवघ्या काही दिवसांत उलगडा करत तीन महिला आरोपींना ताब्यात घेतले आहे. बस प्रवासादरम्यान गर्दीचा फायदा घेत फिर्यादीच्या बॅगेतील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या या महिलांना ओझर परिसरातून अटक करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धुळे येथील सुनील शिवराम येवले (वय 62, रा. आहिल्यादेवी नगर, सूर्य मुखी मारुती मंदिराजवळ, धुळे) हे आपल्या पत्नीसह 10 जून 2026 रोजी सकाळी धुळे येथून एसटी बसने शहादा ते नाशिक असा प्रवास करत होते. प्रवासादरम्यान पिंपळगाव बसस्थानक परिसरात अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बॅगेमधील 23 लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 271/2026 भारतीय न्याय संहिता कलम 303(2) अन्वये दाखल करण्यात आला.



या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा अंबड युनिट-3 कडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान पथकाने फिर्यादीशी संपर्क साधून घटनेची सविस्तर माहिती घेतली तसेच धुळे ते नाशिक रोड दरम्यानच्या उमराणे बसस्थानक ते ओझर बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली.

फिर्यादीने दिलेल्या वर्णनानुसार काही संशयित महिला पिंपळगाव बसस्थानकात बसमधून उतरून एका दिशेने जाताना दिसून आल्या. पोलिसांनी त्या दिशेचा शोध घेत स्थानिक नागरिकांकडे चौकशी केली. त्यावेळी संबंधित महिला ओझर विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वारंवार दिसत असल्याची माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा अंबड युनिट-3 चे पोलीस निरीक्षक मोतीलाल पाटील तसेच अंबड पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील अधिकाऱ्यांनी 19 जून 2026 रोजी ओझर विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचून तीन संशयित महिलांना ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान महिलांनी सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र महिला अंमलदारांच्या मदतीने सखोल चौकशी केल्यानंतर त्यांनी बसमधील गर्दीचा फायदा घेत फिर्यादीच्या बॅगेतील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरी केल्याची कबुली दिली.

**अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :**

1) लागम्मा उलगल्या गड्डी (वय 50), रा. चिकलठाणा, जि. छत्रपती संभाजीनगर 2) मंजुला मल्लेश किसलिप (वय 29), रा. पाणी टाकी, भवानी रोड, सोलापूर 3) पूजा व्यंकटेश किसलिप (वय 26), रा. लक्ष्मी मंदिर, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

सदर तिन्ही महिलांना पुढील कायदेशीर कारवाईसाठी गंगापूर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस निरीक्षक मोतीलाल पाटील, पोलीस उपनिरीक्षक दिलीप साळवे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुहास शिरसागर, पोलीस हवालदार प्रकाश बोडके, योगेश चव्हाण, भगवान जाधव, निकम, महिला पोलीस अंमलदार सविता कदम बेणुगे, तसेच पोलीस अंमलदार मयूर पवार, अनिल गाढवे आणि अंबड गुन्हे शोध पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

23 लाखांच्या चोरीप्रकरणाचा अवघ्या काही दिवसांत उलगडा करून तीन महिला आरोपींना जेरबंद करण्यात गुन्हे शाखा अंबड युनिट-3 ला यश आले आहे.

## सारडा सर्कल परिसरात मनपाचा बुलडोझर; ६० हून अधिक अनधिकृत बांधकामांवर कारवाई



**नाशिक | प्रतिनिधी (२० जून २०२६)**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेने अतिक्रमणाविरोधात मोठी मोहीम राबवत शनिवारी सारडा सर्कल ते मुंबई नाका परिसरातील अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर चालवला. या कारवाईत रस्त्यालगत उभारण्यात आलेली हॉटेल्सची अनधिकृत वाढीव बांधकामे, पत्र्याचे शेड, टपऱ्या आणि पक्की दुकाने जमीनदोस्त करण्यात आली.

सकाळीच मनपाचे अतिक्रमणविरोधी पथक जेसीबी, बुलडोझर आणि मोठ्या कर्मचारी ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मोठा पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता.

महापालिकेने यापूर्वी संबंधितांना नोटिसा बजावल्या होत्या. त्यामुळे काही व्यावसायिकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेतली, तर उर्वरित अतिक्रमणांवर शनिवारी थेट कारवाई करण्यात आली.

सारडा सर्कल येथील स्मशानभूमी आरक्षणाच्या जागेवरील तसेच डी.पी. रस्त्यावरील सुमारे ६० ते ६५ टपऱ्या, दुकाने आणि पत्र्याचे शेड हटविण्यात आले.

याशिवाय हॉटेल डिलक्सच्या मागील बाजूस मनपाच्या मोकळ्या जागेवर ठेवण्यात आलेले भंगार साहित्य हटवून भूखंड मोकळा करण्यात आला. डी.पी. रस्त्यात अडथळा ठरणाऱ्या आठ शेड्सचाही काही भाग तोडण्यात आला.

दरम्यान, त्याच परिसरातील

दरम्यान, त्याच परिसरातील काही अनधिकृत निवासी घरांना पावसाळा संपेपर्यंत मुदत देण्यात आली असून ऑक्टोबरनंतर जागा रिकामी न केल्यास पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती अतिक्रमण विभागाच्या उपायुक्त सुवर्णा दखणे यांनी दिली.

या मोहिमेत तब्बल ६ जेसीबी, १०० ते १५० कर्मचारी आणि पोलीस प्रशासनाचा मोठा फौजफाटा सहभागी झाला होता. कुंभमेळ्यापूर्वी शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मनपाची कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.


# JOB

## नाशिक ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ भरती 2026

### 10/12 वी पास उमेदवारांना नोकरीची उत्तम संधी!

नाशिक ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत ब्रह्मा व्हॅली अध्यापक विद्यालय (D.El.Ed.) मध्ये खालील पदांकरिता भरती जाहीर करण्यात आली आहे. पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पदनिहाय रिक्त जागा**

| पदाचे नाव | जागा |
|---|---|
| प्राचार्य | 01 |
| सहाय्यक (Marathi, Hindi, English, Science, Social Science) | 07 |
| कला/संगीत शिक्षक | 01 |
| क्रीडा शिक्षक | 01 |
| संगणक प्रयोगशाळा सहाय्यक | 01 |
| लिपिक | 01 |
| ग्रंथपाल | 01 |
| शिपाई | 01 |
| एकूण | 14 |

**शैक्षणिक पात्रता**

| | |
|---|---|
| प्राचार्य | M.A./M.Com./M.Sc.+ M.Ed. with 55% |
| सहाय्यक (Marathi, Hindi, English, Science, Social Science) | M.A./M.Com./M.Sc.+ M.Ed. with 55% |
| कला/संगीत शिक्षक | ATD, MA (Music) Sangeet Visharad |
| क्रीडा शिक्षक | M.P.Ed. with 50% |
| संगणक प्रयोगशाळा सहाय्यक | B.C.A./B.Tech with Computer Science |
| लिपिक | B.A./B.B.Com./B.Sc. with MS-CIT |
| ग्रंथपाल | B.Lib./M.Lib |
| शिपाई | 10वी/12वी उत्तीर्ण |

| | |
|---|---|
| नोकरी ठिकाण | नाशिक |
| अर्ज पद्धती | ऑफलाईन |
| अर्ज पाठविण्याचा पत्ता | ब्रह्मा व्हॅली सेंट्रल ऑफिस, पालिका बाजार कॉम्प्लेक्स, रेल्वे बुकिंग ऑफिस जवळ, शरणपूर-त्र्यंबक लिंक रोड, कॅनडा कॉर्नर, नाशिक. |
| अर्ज करण्याची अंतिम तारीख | 26 जून 2026 |
| अधिकृत वेबसाईट | www.brahmavalley.com |

**महत्त्वाच्या सूचना**

- अर्ज ऑफलाईन पद्धतीने करावयाचा आहे.
- अर्ज अंतिम तारखेपूर्वी संबंधित पत्त्यावर पोहोचणे आवश्यक आहे.
- अर्ज करण्यापूर्वी अधिकृत जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.
- अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.


## नाशिक–संगमनेर–पुणे रेल्वे मार्ग रद्द; उत्तर महाराष्ट्रावर अन्यायाचा आरोप, सिन्नरमध्ये रविवारी निर्णायक बैठक!

नाशिक-सिन्नर-संगमनेर-नारायणगाव-आळेफाटा-चाकण-हडपसर या प्रस्तावित सेमी हायस्पीड रेल्वे मार्गाचा प्रकल्प रद्द करण्यात आल्याने उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. उद्योग, रोजगार, शिक्षण, पर्यटन तसेच कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देणारा हा महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्प रद्द करून सरकारने उत्तर महाराष्ट्रावर अन्याय केल्याचा आरोप सिन्नर तालुका रेल्वे कृती समितीने केला आहे.

या निर्णयामुळे प्रदेशाच्या विकासाला मोठा फटका बसणार असल्याचे समितीचे म्हणणे असून, रेल्वे मार्ग पुनर्स्थापित करण्यासाठी आणि सरकारच्या निर्णयाविरोधात व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी सिन्नर येथे रविवारी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सिन्नर तालुका रेल्वे कृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## नाशिकमध्ये वृक्षतोडीला पुन्हा झटका; हरित लवादाने मनपाचा अर्ज फेटाळला



**नाशिक | प्रतिनिधी**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विकासकामांना मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शहरातील वृक्षतोडीवरील स्थगिती उठविण्याची नाशिक महापालिकेची मागणी राष्ट्रीय हरित लवादाने (NGT) फेटाळून लावत पुढील सुनावणीपर्यंत म्हणजेच १४ ऑगस्टपर्यंत वृक्षतोडीवरील बंदी कायम ठेवली आहे.

शहरातील विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात येत असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. यासंदर्भात दाखल याचिकेवर सुनावणी करताना हरित लवादाने यापूर्वीच वृक्षतोडीला स्थगिती दिली होती. मात्र, या आदेशानंतरही काही ठिकाणी झाडे तोडण्यात आल्याचा मुद्दा पुन्हा समोर आल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे.

पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. रस्ते, पूल, घाट आणि इतर पायाभूत सुविधांसाठी हजारो झाडे तोडली

जात असल्याचा दावा वृक्षप्रेमींनी केला आहे. विशेष म्हणजे यामध्ये अनेक जुने व वारसा वृक्षांचाही समावेश असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, स्थगिती आदेशानंतरही २२ झाडांची तोड झाल्याच्या तक्रारीवर महापालिका प्रशासनाला स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र अद्याप संबंधित अधिकाऱ्यांनी आपली बाजू मांडलेली नसल्याने लवादाने दोन आठवड्यांची अंतिम मुदत दिली आहे. तसेच अलीकडेच झालेल्या कथित नव्या वृक्षतोडीबाबतही महापालिकेला नोटीस

बजावण्यात आली आहे.

तपोवनात पर्यावरणप्रेमींची उपस्थिती

या सुनावणीचे थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी तपोवन परिसरात पर्यावरणप्रेमी, जेन-झी आंदोलनातील कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले होते. स्थगिती कायम राहिल्याचे स्पष्ट होताच उपस्थितांनी निर्णयाचे स्वागत केले.

यावेळी पर्यावरणीय नियमांचे

उल्लंघन करून झालेल्या वृक्षतोडीची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच शहरातील हिरवाई, जैवविविधता आणि वारसा वृक्षांचे संरक्षण करण्यासाठी संघर्ष आणखी तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.नाशिकच्या पर्यावरणीय समतोलासाठी आणि शहराची ओळख जपणाऱ्या वृक्षसंपदेच्या रक्षणासाठी नागरिकांचा लढा सुरूच राहणार असल्याचा इशाराही यावेळी देण्यात आला

# कुंभमेळ्याआधी साधू-महंतांची शस्त्र परवान्यांची मागणी; प्रशासनासमोर नवा पेच



नाशिक | सन 2027 मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये एक वेगळीच चर्चा रंगली आहे. कुंभमेळ्यासाठी देश-विदेशातून येणाऱ्या काही साधू-महंतांनी स्वसंरक्षणासाठी शस्त्र परवाने देण्याची मागणी सरकारकडे केली असून, यासाठी संबंधित अर्जही प्रशासनाकडे सादर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, विविध आखाड्यांशी संबंधित काही प्रमुख साधू-महंतांनी पिस्तूल आणि बंदुकीच्या परवान्यासाठी अर्ज दाखल केले आहेत. या अर्जांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात प्राथमिक प्रक्रिया आणि मुलाखतीही पार पडल्याचे सांगितले जात आहे. कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक सुरक्षा उपाय म्हणून शस्त्र परवाने मिळावेत, अशी त्यांची भूमिका आहे.साधू-महंतांच्या मते, काही वर्षांपूर्वी घडलेल्या पालघर साधू हत्याकांडानंतर सुरक्षेबाबतची चिंता वाढली आहे. मोठ्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये लाखो भाविकांची उपस्थिती असते. अशा परिस्थितीत संभाव्य धोक्यांचा सामना करण्यासाठी स्वसंरक्षणाची साधने उपलब्ध असावीत, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, या मागणीमुळे प्रशासनासमोर वेगळेच आव्हान निर्माण झाले आहे. काही आखाड्यांमध्ये किंवा धार्मिक गटांमध्ये वाद निर्माण झाल्यास परवानाधारक शस्त्रांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने संबंधित यंत्रणा सावध भूमिका घेत असल्याचे समजते. त्यामुळे प्रत्येक अर्जाची स्वतंत्र पडताळणी करूनच निर्णय घेतला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

या संदर्भात राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनीही विषय गांभीर्याने घेतला जाईल आणि नियमानुसार योग्य तो निर्णय केला जाईल, असे संकेत दिले आहेत.

# नीट यूजी २०२६ पुनर्परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजनाचे निर्देश - नाशिक जिल्हाधिकारी




नाशिक : राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (NTA), नवी दिल्ली यांच्या वतीने रविवार, २१ जून २०२६ रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत घेण्यात येणाऱ्या नीट यूजी २०२६ पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी आयुष प्रसाद यांनी सर्व संबंधित विभागांना समन्वयाने काम करत सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, उपजिल्हाधिकारी कुंदन हिरे (प्रशासन) तसेच परीक्षा एजन्सीचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी सांगितले की, नीट यूजी ही अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाची परीक्षा असून कोणतेही गैरप्रकार घडणार नाहीत याची विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या सूचनांनुसार विद्यार्थ्यांनी निर्धारित वेळेत परीक्षा केंद्रांवर उपस्थित राहावे.

परीक्षेच्या व्यवस्थापनासाठी उपकेंद्रनिहाय संपर्क अधिकारी नियुक्त करण्यात आले असून त्यांनी परीक्षा केंद्रांना भेट देऊन विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या मूलभूत सुविधांचा आढावा घ्यावा, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

विद्यार्थ्यांना सुरक्षित, पारदर्शक आणि सुरळीत परीक्षा वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने सर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यावर भर दिला आहे.

# लाडक्या बहिणी योजनेत मोठी छाननी; नाशिक मधील सुमारे दीड लाख महिला लाभापासून वंचित!

राज्यातील लाडक्या बहिणी योजनेचा मे महिन्याचा हप्ता १६ जूनपासून लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, नाशिक जिल्ह्यात झालेल्या सखोल पडताळणीमध्ये मोठ्या प्रमाणात अर्ज अपात्र ठरल्याचे समोर आले आहे.

प्रशासनाने ई-केवायसी, कागदपत्रांची तपासणी आणि पात्रतेच्या निकषांची पडताळणी केल्यानंतर सुमारे १.५ लाख महिलांना अपात्र घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे या महिलांना योजनेचा आर्थिक लाभ मिळणार नसल्याची माहिती समोर आली आहे.

अपात्र ठरण्याची प्रमुख कारणे - कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ₹२.५ लाखांपेक्षा अधिक असणे

- आवश्यक कागदपत्रे अपूर्ण किंवा उपलब्ध नसणे
- आधार, बँक खाते, नाव किंवा जन्मतारखेमधील विसंगती
- पात्रतेच्या अटी पूर्ण न होणे

योजना सुरू झाल्यानंतर नाशिक जिल्ह्यात लाखो महिलांनी अर्ज केले होते. मात्र, पडताळणी प्रक्रियेनंतर पात्र लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे दिसून येत आहे.











